# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB 66/2025

## प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई    दिनांक २२/११/२०२५

**''वेश्याव्यवसायातुन ०२ महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक २०/११/२०२५ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,''श्रीनिधी हॉटेल अॅण्ड लॉजिग, प्लॉट नंबर ४५, सेक्टर १९/सी, ए.पी.एम.सी., नवी मुंबई येथे लॉज मॅनेजर हा वेश्यागमनासाठी मुली व महिला लॉज मध्ये बोलावुन ग्राहकास दाखवुन ग्राहकाने मुलगी पसंद केल्यानंतर ग्राहकाकडुन वेश्यागमनाचे ५०००/— रूपये घेतो.

वपोनि/घोरपडे यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास श्रीनिधी हॉटेल अॅण्ड लॉजिग येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला असता त्याठिकाणी ०२ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मॅनेजर मस्तराम रामस्नेही कनोजिया, वय २९ वर्षे, रा. सेक्टर १९, नवछावा बिल्डींग, वाशी नवी मुंबई, वेटर विशाल अवद यादव, वय २३ वर्षे, रा. नमुद लॉज मध्ये, मुळ रा. ग्राम बराडी, थाना मथुरहन, जि.चत्रा, झारखंड, लॉज मालक रघु अण्णा (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) मो.नं. ९८७०१३६५२५ यांनी महिला पुरवणारा सोनु उर्फ शाहिन हुसेन मंडल, वय २८ वर्षे, रा.रूम नंबर ४०१, सेक्टर ०६, सारसोळे, नवी मुंबई, मुळ रा. नित्यानंद काठी, थाना स्वरूप नगर, जि. नॉर्थ २४ परगाना, पश्चिम बंगाल यांच्या नमुद ०२ पिडीत यांना प्राप्त करुन लॉज मध्ये ठेवलेल्या होत्या. मॅनेजर मस्तराम याने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन ४५००/— रूपये स्विकारले.

आरोपी (१) मॅनेजर मस्तराम रामस्नेही कनोजिया (२) वेटर विशाल अवद यादव (३) महिला पुरवणारा सोनु उर्फ शाहिन हुसेन मंडल तसेच (४) पाहिजे आरोपी रघु अण्णा (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) मो.नं. ९८७०१३६५२५ यांनी आपसात संगनमत करून ०२ पिडीत महिलांचा वेश्याव्यवसायासाठी वापर केला. म्हणून त्यांचे विरूध्द भा.न्या.सं.कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा तपास ए.पी.एम.सी. पोलीस ठाणे करत आहे. सदर गुन्हयातील ३ आरोपी यांना अटक केली असुन त्यांची दिनांक २४/११/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/राजश्री शिंदे, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/१३२ मांडोळे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३२५४ कोलते, पोशि/३२३९ पारासुर, पोशि/३०६१ चव्हाण, मपोहवा २५०१ अडकमोल, मपोहवा/२५०७ पावडे, मपोना/२९८४ अनिता भोये, चालक पोहवा/मोहिते यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक